**नियमित दिवाणी दावा क्र.२५३/२०११**
सुदाम वि. अरुणचंद
CNR No.MHAU050014952011

## निशाणी क्र.१९ खालील आदेश

१. प्रस्तुत अर्ज हा वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्ज व त्यावरती प्रतिवादींनी दाखल केलेल्या जबाबाचे अवलोकन केले. वादी व विव्दान वकील सतत गैरहजर असल्यामुळे त्यांच्यावतीने युक्तिवाद ऐकला नाही. प्रतिवादीतर्फे विव्दान वकील श्री.जे.डी.हरीदास यांचा युक्तिवाद ऐकला.

३. उभय पक्षकारांच्या वतीने करण्यात आलेले परस्पर विरोधी कथने विचारात घेता प्रस्तुतचा अर्ज निकाली काढते वेळी खालील मुद्दे माझे विचारात उपस्थित होतात.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादींचा दावा दुरुस्तीचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे काय ? | होकारार्थी. |
| २ | आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ करीताः**–

४. अर्जातील कथनांना पुष्टी देण्यासाठी वादीने निशाणी १९–अ वर स्वतःचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. वादीचे थोडक्यात कथन असे की, प्रस्तुतचा दावा हा वादी हे दावा मिळकतीचे मालक व कब्जेदार असल्याचे जाहीर होवून निरंतरची ताकीद मिळावी यासाठी दाखल केलेला आहे. दाव्यामध्ये जरी वादींनी दावा मिळकत ही त्यांच्या ताब्यामध्ये असल्याचे कथन केले असले तरी ताब्याबाबत विस्तृतपणे नमुद करणे राहून गेले आहे. तरी दाव्यामध्ये वादीच्या ताब्याबाबत आवश्यकत ती दुरुस्ती करण्याची परवानगी मिळावी यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

५. याउलट, प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज हा वादीने दावा प्रलंबित करण्यासाठी दाखल केला असून वादीच्या विनंतीनुसार दुरुस्तीची परवानगी दिल्यास दाव्याच्या स्वरुपामध्ये बदल होईल. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

६. उभय पक्षकारांच्या वतीने करण्यात आलेला परस्पर विरोधी कथने विचारात घेवून अभिलेखाचे काळजीपूर्वक अवलोकन केले. अभिलेखावरुन असे

दिसते की, वादींनी गांव मौजे कांगोणी, ता.वैजापूर येथील गट क्र.८२/२ व गट क्र.८२/१ मधील क्षेत्रामध्ये त्यांचा निम्मा हिस्सा असून ते सदर हिस्स्याचे ताबे वहिवाटीत असून प्रतिवादींनी त्यांच्या ताबे वहिवाटीस हिला हरकत करु नये अशी निरंतरची ताकीद व जाहीरनामा करुन मिळणेसाठी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. वादींनी दाव्यामध्ये जरी या अर्जातील दुरुस्ती नुसार त्यांच्या ताबे वहिवाटीबाबत विस्तृत वर्णन करण्याची परवानगी मागितली आहे. त्यानुसार परवानगी दिल्यास दाव्याच्या स्वरुपामध्ये काहीएक बदल होणार नाही.

७. **दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७** नुसार न्यायालयास दाव्याच्या कोणत्याही टप्यास दावा गुणदोषावरती अंतिमतः निकाल लावणेसाठी रास्त वाटेल अशी दुरुस्ती उभय पक्षकारांना करण्याची परवानगी देण्याची तरतुद नमुद आहे. प्रस्तुतच्या दाव्यामध्ये अद्याप मुद्दे निघालेले नाहीत. त्यामुळे वर नमुद कथनांच्या अनुषंगाने वादीस दावा दुरुस्त करण्याची परवानगी देणे उचित ठरते. सबब, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.२ करीताः**–

८. मुद्दा क्र.१ चे उत्तरादाखल वादी हे विनंतीनुसार दावा दुरुस्ती करण्यासाठी पात्र ठरलेले आहेत. असे असूनही, वादींना सदरचा अर्ज दाखल करण्यासाठी विलंब झालेला आहे. अर्जातील कारण व दुरुस्ती विचारात घेता अर्ज

मंजूर करतेवेळी योग्य तो परिव्यय लावणे उचित ठरते. सबब, मी मुद्दा क्र.२ चे उत्तरादाखल पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज रुपये ७५०/– खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२. खर्चाची रक्कम प्रतिवादींना दयावी.

३. वादीने मुदतीमध्ये योग्य ती दुरुस्ती करावी.

Yunus Jafarsab Tamboli

Digitally signed by Yunus Jafarsab Tamboli
Date: 2019.07.26 16:54:51 +0530

दिनांकः २६/०७/२०१९. ( वाय.जे. तांबोळी )

वैजापूर. २ रे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर, वैजापूर.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : R.V. Patil, |
| Court | : Shri. Y.J. Tamboli<br>2nd Jt.Civil Judge J.D., Vaijapur,<br>Dist. Aurangabad. |
| Date | : 26.07.2019 |
| Order signed by the presiding officer on | : 26.07.2019 |
| Order uploaded on | : 29.07.2019 |